# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## ५७ वा दीक्षान्त समारंभाची सूचना

विद्यापीठाचा ५७ वा वार्षिक दीक्षान्त समारंभ मार्च २०१७ मध्ये करण्याचे योजीले असून **मार्च/एप्रिल २०१६** आणि **ऑक्टोबर/नोव्हेंबर २०१६** मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षा मधील यशस्वी स्नातंकाना सदर समारंभात पदव्यांचा अनुग्रह करण्यात येणार आहे. पदवी प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरीता विद्यार्थ्यांकडून आवेदन पत्र मागविण्यात येत आहेत.

सदर समारंभाच्या दिवशी विद्यापीठात उपस्थित राहुन तसेच अनुपस्थित राहून पदवी प्राप्त करण्यासाठी पदवी आवेदन पत्र सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक **१० मार्च** २०१७ असणार आहे. सदर आवेदन पत्रे विद्यापीठाच्या प्रकाशन विभागामध्ये विक्री केंद्रात तसेच http://bamu.ac.in/Examination%20Form/degree.pdf या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. संबंधीत अर्जासोबत सर्व गुणपत्रिकेच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. अर्जासोबत पदवी शुल्क खालील प्रमाणे असावे असे परीपुर्ण आवेदन पत्रे **पदवी प्रदान कक्ष, परीक्षा भवन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद ४३१ ००४** या पत्त्यावर टपालाने अथवा प्रत्यक्ष स्वीकारले जातील.

| पदवी प्रकार | महाराष्ट्रातील रहीवासी विद्यार्थ्यांना (स्पीड पोष्ट व्दारे) | महाराष्ट्राबाहेरील रहीवासी विद्यार्थ्यांना (स्पीडपोष्ट व्दारे) |
|---|---|---|
| प्रथम पदवी | २५०/- | ३००/- |
| व्दितीय पदवी | ३५०/- | ४००/- |
| एम.फील पदवी | ५५०/- | ६००/- |
| पीएच.डी. पदवी | ६५०/- | ७००/- |

**पदवी नोंदणी शुल्क खालील पध्दतीने भरता येईल.**

पदवी आवेदन पत्रासोबत दिलेल्या बँक चालान द्वारे बँक ऑफ मराराष्ट्र च्या कोणत्याही शाखेत रोखीने भरता येईल व शुल्क भरल्यानंतर विद्यापीठ चालान प्रत अर्जासोबत जोडावी.

विद्यार्थ्यांना समारंभास उपस्थित/अनुपस्थित राहून पदवी प्रमाणपत्र घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी दिलेल्या तक्त्यानुसार पदवी शुल्क व टपाल खर्चासह दर्शविण्यात आलेले एकुण शुल्क भरणे अनिवार्य आहे.

उपरोक्त शुल्क तक्त्यात नमुद केलेले एकुण पदवी शुल्क अनिवार्य (टपाल खर्चासह) असून जे विद्यार्थी समारंभास गैरहजर राहतील, अशा विद्यार्थ्यांना त्यांचे पदवी प्रमाणपत्र समारंभानंतर साधारणत: एक महिन्याच्या कालावधीत त्यांनी आवेदन पत्रात नमूद केलेल्या पत्त्यावर स्पीड पोष्टाने पाठविण्यात येईल.

जे विद्यार्थी सदर समारंभापूर्वी पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज करणार नाहीत अशांना तद्नंतर रुपये १००/- प्रथम वर्षास व तद्नंतर रुपये ५०/- प्रतिवर्षी प्रमाणे अधिकचा विलंब शुल्क भरावा लागेल. **उक्त प्रमाणे शुल्क व तारखा केवळ ऑक्टोबर/नोव्हेंबर २०१६ च्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी आहेत व केवळ ऑक्टोबर/नोव्हेंबर २०१६ मध्ये घेण्यात आलेल्या अंतीम परीक्षातील यशस्वी स्नातकांनाच या समारंभास अर्ज करता येईल.**

**संदर्भ:क्रमांक /परीक्षा/पदवी/२०१७/**
**दिनांक २८ फेब्रुवारी २०१७**
**विद्यापीठ परीसर,**
**औरंगाबाद ४३१ ००४**

**--स्वाक्षरीत--**
**डॉ. दिगंबर एम. नेटके**
**परीक्षा नियंत्रक**

**या परीपत्रकाची एक प्रत माहीतीस्तव तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव खालील प्रमाणे संबंधीताना पाठविण्यात येत आहे.**

१. सर्व विभाग प्रमुख, शैक्षणिक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

२. सर्व प्रशासकीय अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

३. संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्र, उस्मानाबाद

४. सर्व प्राचार्य/संचालक, संलग्नित महाविद्यालये, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

५. जनसंपर्क अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना देण्यात येवुन कळविण्यात येते की सदरील परिपत्रकास बातमी स्वरुपात विविध दैनिकाच्या सर्व आवृत्तीत प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी.

६. एमकेसीएल, ई-सुविधा केंद्र, विद्यापीठ परीसर यांना देण्यात येवुन विनंती करण्यात येते की, आपल्या संकेत स्थळावर या परीपत्रकास विशेष स्वरुपात प्रसिध्दी द्यावी.

७. विभाग प्रमुख, युनिक यांना देण्यात येवुन विनंती करण्यात येते की, सदर परीपत्रकास विद्यापीठाच्या संकेत स्थळावर विशेष प्रसिध्दी द्यावी.

**--स्वाक्षरीत--**
**डॉ. दिगंबर एम. नेटके**
**परीक्षा नियंत्रक**